
REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 6 | MARCH - 2018

# महिपतीबुवा ताहराबादकर यांच्या चरित्रग्रंथांचे आशय सौंदर्य

प्रा. डॉ. बाळासाहेब गार्डी
अध्ययन व संशोधन केंद्र. रा. ब. नारायणराव बोरावके महाविद्यालय. श्रीरामपूर.

## प्रास्ताविक :



महिपतींच्या अनुभवाप्रमाणेच त्यांचे आशयविश्वही वैविध्यपूर्ण आहे. संपूर्ण हिंदुस्थानातील संत व भक्तांच्या या चरित्र कथा असल्याने हा आशय त्या त्या प्रदेशाची वैशिष्ट्ये घेऊन आलेला दिसतो. महिपतीबुवांना या सर्वच लेखनातून परमेश्वर भक्तीचा प्रचार आणि प्रसार करावयाचा असल्याने त्यांच्या लेखनाचा आकृतीबंध ठरलेला आहे. प्रत्येक व्यक्तीने परमेश्वराचे नामस्मरण करावे, परमेश्वर भक्तीचा प्रसार करण्यासाठी भक्तांची कशी चिंता वाहतो, त्यांच्यासाठी किती कष्ट सहन करतो. यासाठी विविध संतांच्या जीवनातील कथांचा आधार घेतलेला आहे. संतजीवनात सर्व जीवनमूल्य नीतीतत्व मूर्त झालेली असतात. त्यांचे आदर्श समाजासमोर ठेवल्यास ते मार्गदर्शक ठरतात. तसेच समाजात भक्तीभावनेचा उदय होण्यासाठी उपयोग होतो.

महिपतीबुवांच्या सर्वच ग्रंथात आलेली चरित्रे ही संपूर्ण भारतातील असून सर्व जातिधर्मातील आहेत. मात्र त्या सर्वांमध्ये भक्ती हा समान धागा आहे. प्रत्येकाचा परमेश्वर वेगवेगळा असेल, भक्तीचे माध्यम वेगळे असेल. तरीही भक्तीचा प्रचार आणि प्रसार करणे हेच सर्व संतांच्या जीवनाचे ध्येय दिसून येते. 'भक्तविजय, संतलीलामृत, भक्तलीलामृत व संतविजय' या चरित्रग्रंथांमध्ये मिळून **284** संतांची चरित्रे सांगितलेली आहेत. तसेच 'कथासारामृत' या ग्रंथात पुराणातील विविध कथा सांगितलेल्या आहेत. त्यामुळे या सर्व कथांमध्ये आशय वैविध्य मोठया प्रमाणात दिसून येते.

महिपतीबुवा स्वतः एक श्रेष्ठ भक्त असल्याने व लहानपणापासूनच त्यांच्यावर वारकरी संप्रदायाचे संस्कार झाल्याने ते या सर्व चरित्र विषयांशी सहज एकरूप झालेले दिसतात. चरित्रलेखन तसे अवघड काम मानले जाते. प्रत्येक संताची भूमिका,जीवन जगण्याच्या पद्धती वेगवेगळया असतात. त्यांच्या भूमिकेशी लेखकाला समरस होऊन लेखन प्रपंच करावा लागतो. महिपतीबुवांना संतांविषयीचे अलौकिक प्रेम असल्याने सर्व संतांच्या जीवनाचे ते समरसून वर्णन करतात.

कोणी गुणानुवाद वर्णित | सप्रेम कीर्तनी करिती नृत्य
त्यांना उद्धरोनि जीव बहुत | सायुज्य मुक्ती पावले - **71**
कोणी संतसेवेसि होवोनि तत्पर | सत्वासि नाही दिधले अंतर
इतुक्या भक्तांची नाना चरित्रे | एका सादर भाविक हो - **72** [4]

अशा पद्धतीने महिपतीबुवा नाथ, वारकरी, समर्थ संप्रदायावरोबरच महाराष्ट्राबाहेरील विविध संप्रदायातील संतांची चरित्रे वर्णन करतात.

**नाथ संप्रदाय :**

नाथ संप्रदायातील मच्छिंद्रनाथ, गोरक्षनाथ,जालिंदरनाथ, कानिफनाथ, मीननाथ इ. नाथांची चरित्रे महिपतीबुवा विस्ताराने लिहितात. या चरित्रांमधून नाथ संप्रदायाच्या वरील व्यक्तिमत्त्वांचा शोध घेतानाच त्यांचे तत्वज्ञान, आचरण धर्माचीही माहिती मिळते.

जालंधर म्हणे तिज लागी | जोगी नव्हे मी भवरोगी
भस्म चर्चोनि सर्वांगी | उघडा जगी फिरतसे [5]

अशा एकाच ओवीत नाथांचा आचारधर्म सांगितलेला आहे. पतिवियोगामुळे सदैव दुःखी झालेल्या गौडबंगाल देशाच्या राणीला ऐहिक सूख,मायेचा त्याग करून आत्मसुखाचे चिंतन करणा-या जालिंधराने केलला उपदेश, तर विषयसुखात रमलेल्या गोपीचंद राजाने पत्नीच्या सांगण्यावरून जालिंधरांना विहिरीत कोंडून मारण्याचा प्रयत्न करणे. गुरूच्या शोधासाठी वर्षानुवर्षे भटकणारा कानिफनाथ, विषयलंपट झालेल्या मत्सेंद्रनाथांना परत भक्तिमार्गात आणणारा गोरक्षनाथ समाजाच्या उद्धारासाठी निरनिराळे देश व तीर्थयात्रा करत फिरणा-या नाथांच्या वैविध्यपूर्ण कथा महिपतीबुवांनी अतिशय रंजकतेने वर्णन केलेल्या आहेत. संत ज्ञानेश्वर हे नाथ संप्रदायातूनच आलेले असल्याने वारकरी संप्रदायातही नाथांचे विचार आलेले दिसतात.

**वारकरी संत :**

महाराष्ट्रातील सर्वात महत्वाचा आणि वैशिष्टयपूर्ण संप्रदाय म्हणून वारकरी संप्रदाय ओळखला जातो. सर्वसामान्य जनतेत समानतेचा अनुभव देणारा, प्रेमाची अनुभूती देणारा व सहजतेने आचरता येणारा संप्रदाय म्हणून तो ओळखला जातो. महिपतीबुवा स्वतः वारकरी संत असल्याने अतिशय भक्तिभावाने व आदराने या संप्रदायातील संतांची व भक्तांची चरित्रे गातात. ज्ञानेश्वरांपासून तुकारामांपर्यंत सर्व प्रमुख संतांप्रमाणेच इतर सर्व संतांची चरित्रे ते गातात. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ व तुकारामांची चरित्रे अतिशय विस्तृत, रसाळ व प्रयत्नपुर्वक सांगितलेली असून तुलनेने इतर संतांची चरित्रे त्रोटक स्वरूपात आलेली आहेत. या सर्व चरित्रांच्या माध्यमातून समाजात भक्तीचा प्रसार आणि प्रचार करणे ही महिपतीबुवांची मुख्य भूमिका दिसून येते. त्यामुळेच आज आपणास या सर्व संतांच्या अफाट सामर्थ्याची जाणीव होत आहे. या चरित्रांमुळेच वारकरी संप्रदायाचा व महाराष्ट्राचा इतिहास, आचारधर्म, उपदेशातून शिकवण, संस्कृती आणि तत्वज्ञान पुढील पिढयांना मिळत आहे. एका अर्थाने हे फार मोठे सांस्कृतिक जडणघडणीचे कार्य म्हणता येई ल.

महिपतीबुवांच्या संतकथांनी शास्त्रप्रामाण्य व जातिव्यवस्थेला कुठेही धक्का न लावता स्त्रीशुद्रादिकांनाही आत्मविकासाचा मार्ग दाखवून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. या चरित्रांमधून महिपतीबुवांची विठ्ठलावरील निष्ठा,संतांबद्दलचा आदर, धर्मपरायण मनोवृत्ती दिसून येते. महिपतीबुवांनी उत्तरेतील नाभाजी व उद्धव चिद्घन यांच्या चरित्रलेखनाचा आधार घेऊन लेखन करीत असल्याचे म्हटले असले तरी पुढील भागात मात्र स्वताःच्या ज्ञानाच्या व माहितीच्या आधारावरच लेखन केल्याचे दिसून येते. काही भागात नामदेवांच्या 'तीर्थावळी'चाही आधार घेतलेला दिसून येतो. कलियुगात भक्तीचा प्रसार करण्यासाठीच परमेश्वराने विविध संतांचे अवतार धारण केल्याचे सांगून त्यांना दैवी व्यक्तिमत्व बहाल केल्याचे दिसून येते. त्यामुळे त्यांच्या चमत्कारांचे समर्थनही होताना दिसून येते.

उद्धवाचा अवतार मानलेल्या अयोनिसंभव जन्म घेणारे म्हणून वलयांकित व्यक्तिमत्व म्हणून नामदेवांचे चरित्र आलेले आहे. विष्णूचा अवतार म्हणून ज्ञानेश्वर सर्व जातिधर्माच्या भक्तांना बरोबर घेऊन वारकरी संप्रदायाचा पाया भक्कम करतात. नामदेवांबरोबर तीर्थयात्रा करीत भारतभर प्रवास करून भक्तिमार्गाचा प्रसार करतात. त्यांची कबीरांशी भेट घडवून आणून एक सांस्कृतिक देवाणघेवाणही पार पाडतात. विठ्ठल निवृत्ती, ज्ञानेश्वर, सोपानदेव, सावतामाळी, जगमित्र नागा, विसोबा, चोखामेळा, बंका इ. भक्तांबरोबर केलेल्या जेवणावळीच्या वर्णनातून अध्यात्मिक लोकशाहीचे दर्शन घडवतात. जन्मापासून हातपाय नसलेला भक्त कूर्मदास, विठ्ठलाला आपले पोट चिरून लपवणारा, शेतीकामातच विठ्ठल पाहणारा सावतामाळी, प्रपंच टाकून पत्नीसह विठ्ठलाला शरण गेलेला राका कुंभार,विठ्ठलाशी पूर्ण तादात्म्य पावलेला गोरा कुंभार, कट्टर शैव असलेला नंतर एकनिष्ठ विठ्ठलभक्त बनणारा नरहरी सोनार,नामदेवाची दासी असूनही संतपदापर्यंत पोहचलेली जनाबाई, जातीने महार असूनही श्रेष्ठ भक्तापर्यंत प्रवास करणारा चोखामेळा, विष्णूभक्त चांभार रोहिदास, सेना न्हावी, वेश्येच्या पोटी जन्म घेऊनही विठ्ठलरूपात लीन होणारी कान्होपात्रा, राजसेवा सोडून पंढरपूरात जाऊन राहणारा दामाजी, भिका-याचे बोलणे ऐकूण विरक्त झालेला राजा शांतब्राम्हणी, विठ्ठलमूर्ती पंढरपूरला परत आणणारे संत भानूदास, त्यांचाच पणतू वारकरी संप्रदायाची पुनःस्थापना करणारे संत एकनाथ, आपल्या कर्तृत्वाने वारकरी संप्रदायाचा कळससाध्य बनलेले संत तुकाराम इ. सर्व संतांनी आपल्या भक्तीच्या बळावर विठ्ठलाला आपलेसे करून घेतले. अनेक संतांनी आपला संसारच

विठ्ठलमय करून टाकला . कर्मातच ईश्वर शोधण्याचा प्रयत्न केला . संत रामदासांचे रामभक्तीत लीन झालेले व्यक्तिमत्त्व, त्यांचा स्वतंत्र समर्थ संप्रदाय, विरक्त व प्रपंचज्ञान शिकवणारे तत्वज्ञान, वारकरी संप्रदायाशी काही साम्य तर काही भेदही दर्शवणारा आशय महिपतीबुवांनी व्यक्त केलेला आहे .

वारकरी संतांप्रमाणेच महाराष्ट्राबाहेरही काही संत, भक्त होऊन गेले . जे विष्णूभक्त, शिवभक्त, रामभक्त, कृष्णभक्त म्हणून ओळखले गेले . या संतांनीही आपापल्या प्रदेशात भक्तीचा प्रसार करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो . नामदेवांच्या जन्माशी साधर्म्य दर्श विणारे व शुकाचार्यांचा अवतार म्हणून ओळखले जाणारे उत्तरेतील संत कबीर . कमाल हा त्यांचाच मुलगाही श्रेष्ठ भक्त म्हणून लोकप्रिय झाला . व्यासांचा अवतार म्हणून ब्राम्हण रूपात जन्म घेतलेले जयदेव, वाल्मिकीचा अवतार रामभक्त तुलसीदास, शिवालयात कृष्णलीला गाणारा जुनागढचा नरसी मेहता, कृष्णाच्या शापाने सामान्य जनांच्या उद्धारासाठी अवतार धारण करणारा सूरदास, भक्तीत अंतर पडले म्हणून हात कापून घेणारा सात्विक राजा, देवाला नैवेद्य खाऊ घालणारी गरीब कर्माबाई, उदयपूरची कृष्णाला सर्वस्व मानून त्याच्यासाठी विष प्राशन करणारी मीराबाई इ . संतांचे कार्य वारकरी संतांच्याप्रमाणेच भक्तीचा प्रसार करणारे होते . त्यांचा प्रदेश, देव वेगवेगळा असला तरी अंतिम हेतू मात्र एकच होता .

'कथासारामृत' या ग्रंथात पुराणकथा सांगताना महिपतीबुवांचा संस्कृतचा व्यासंग दिसून येतो . पद्मपुराण, वायुपुराण, स्कंदपुराण, इ . नानापुराणातील मूळ कथांच्या आराखडयात महिपतीबुवांनी फारसा बदल केलेला नाही . योग्य त्या प्रसंगांना व त्यातील कथांना काव्यकथनाच्या दृष्टिने उठाव देण्यासाठी आपल्या सोयीप्रमाणे काव्यातील प्रसंगांचा संक्षेप आणि विस्तार केलेला आहे . या सर्व कथांच्या आधारेही भक्तीचे माहात्म्य सांगितलेले असून व्रतवैकल्याचे महत्व विंबवण्याचा प्रयत्न केलेला आहे . या कथा रंजनासाठी नसून आत्मोद्धारासाठीच असल्याचे महिपतीबुवा विश्वासाने सांगतात .

## संदर्भ ग्रंथ –


1 . आजगावकर ज . रा ., 'प्राचीन मराठी संतकवी' खंड **3** रा,महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई **1980**

2 . आवलगावकर रमेश, 'कथासारामृत', देवगिरी प्रकाशन, शिरूर

3 . उपाध्ये वी . डी ., 'संत गोरा कुंभार ः वाङ्मय दर्शन', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे प्रथम आवृत्ती **2008**

4 . कांबळे गो . म्हा ., 'श्री संत महिपती महाराज चरित्र',श्री संत साहित्य सेवा संघ, सोलापूर

5 . कानडे मु . श्री ., 'संताची हे भेटी', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे

6 . काळे|नगरकर, 'संतसाहित्य ः अभ्यासाच्या काही दिशा',स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे प्रथम आवृत्ती **1992**

7 . कुलकर्णी गो . म ., 'संत साहित्य ः काही निरीक्षणे', मेहता पब्लिशिंग हाऊस,पुणे **1994**

8 . कुलकर्णी गो . म ., 'महाराष्ट्राची सत्त्वधारा', दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे **1981**





**प्रा . डॉ . बाळासाहेब गार्डी**

**अध्ययन व संशोधन केंद्र रा . ब . नारायणराव बोरावके महाविद्यालय. श्रीरामपूर .**